
# आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

शनिवार दि. १८ डिसेंबर व रविवार दि. १९ डिसेंबर, २०२१



ISBN: 978-81-931719-7-4

"उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः!


## आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

ता. जावळी, जि. सातारा


---

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्न

आयोजित

शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूरचे (सुयेक)

३१ वे व ३२ वे संयुक्त अधिवेशन

शनिवार दि. १८ डिसेंबर व रविवार दि. १९ डिसेंबर, २०२१ रोजी

---

# शिवार्थ २०२१

**◆ स्मरणिका ◆ अंक २० वा**

स्वागताध्यक्ष

**प्र.प्राचार्य, डॉ.प्रमोद घाटगे**

प्रमुख संपादक 'सुयेक'

**डॉ.संजय ठिगळे**

स्थानिक संपादक

**डॉ.संजय धोंडे**

स्थानिक कार्यवाहक

**डॉ.सुजित कसबे**

# स्मरणिका

# शिवार्थ- २०२१

ISBN: 978-81-931719-7-4

**प्रकाशन स्थळ:**

आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

**प्रकाशन काळ:**

वार्षिक

**मुद्रक:**

अक्षय प्रिंटर्स, सातारा.

**प्रकाशकाचे नाव:**

अक्षय प्रिंटर्स, सातारा.

**प्रमुख संपादकाचे नाव:**

प्रा. संजय ठिगळे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

**प्रकाशन:**

शनिवार दि. १८ डिसेंबर, २०२१.

या अंकातील शोधनिबांधात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन पेपर | | संशोधक | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| | स्वागताध्यक्ष मनोगत | : | प्र. प्राचार्य,डॉ. प्रमोद घाटगे | २ |
| | संपादकीय | : | प्रा. संजय ठिगळे | २ |
| | स्थानिक संपादक मनोगत | : | डॉ. संजय धोंडे | |
| | स्थानिक कार्यवाह मनोगत | : | डॉ. सुजित कसबे | |
| | सुयेक वार्षिक अहवाल | : | डॉ. एम. जी. पाटील | |
| | परिचय: अध्यक्ष, सुयेक ३१ वे वार्षिक अधिवेशन | : | | |
| | अध्यक्षीय भाषण | : | डॉ. अनिलकुमार वावरे | |
| | **विषय:भारतातील सध्याचे आर्थिक संकट** | | | |
| १ | कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि भारतीय कापड उद्योग | | *प्रा. डॉ. पी. एस. कांबळे<br>** डॉ. काशिनाथ तनंगे | १-८ |
| २ | भारत आणि सन १९९१ नंतरच्या आंतरराष्ट्रीय व्यापार तुटीची समस्या | | *डॉ. सी. आर. जाधव<br>** डॉ. राहुल शं. म्होपरे | ९-१ |
| ३ | कोविड १९- चा भारताच्या शेती व औद्योगिक क्षेत्रावरील परिणाम : एक दृष्टीक्षेप | | *डॉ. एम.एस. सुर्यवंशी | १३-१ |
| ४ | भारतीय अर्थव्यवस्थेवरील संकट: कोरोना | | *डॉ. धेडे डी. आर. | १८-२ |
| ५ | कोरोना काळातील मानवी संसाधनाची दुरावस्था : अन्वयार्थ | | *प्रा. गजानन खामकर<br>** प्रा. किशोर सुतार | २३-२ |
| ६ | कोविड-१९ काळातील भारतातील बेरोजगारी: एक गंभीर समस्या | | *डॉ. सोमनाथ काळे,<br>**डॉ.कैलास पाटील | २९-३ |
| ७ | कोरोनाचे भारतातील कामगारवर्गावरील संकट | | *डॉ. दत्तात्रय शेडगे | ३३-३ |
| ८ | कृषी विधेयक २०२० स्वरूप आणि अडचणी | | *डॉ. मोहन सदामते | ४०-४ |
| ९ | जयसिंगपूर शहरातील मोबाईल विक्रीवरील कोविड-१९ चा परिणाम | | *डॉ. व्ही . बी . देवकर | ४२-४ |
| १० | कोव्हिड-19-आणि शिक्षणाची सद्य:स्थिती | | *प्रा. डॉ. जयश्री चव्हाण | ४६-४ |
| ११ | कोरोना काळातील शेती: आव्हाने व संधी | | *डॉ. अजित सूर्यवंशी | ४९-५ |
| १२ | भारतील कापड उद्योग स्थिती, करणे व परिणाम | | *डॉ. लक्ष्मण करपे | ५२-५ |
| १३ | कोविड-१९ उगम, प्रसार आणि आरोग्य व्यवस्था | | *श्री. रामचंद्र कवितके | ५८-६ |
| १४ | कोरोनाचा उगम, प्रसार आणि बदलते जागतिक संबंध | | *कु. पूजा शिर्के | ६३-६ |
| १५ | कोरोना काळातील RBI चे मौद्रिक धोरण | | *डॉ. प्रमोद घाटगे | ६६-६ |
| १६ | कोरोना काळातील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती | | *श्री. पुष्पेंद्र बिचकर | ७०-७ |
| १७ | The Impact of Covid- 19 on Indian Meat Market | | *Prof. Sachin Nikam | ७३-७ |
| १८ | Feasibility of Protocols for Restaurants during COVID-19 Pandemic | | *Mr. Ashish Bhasme<br>**Dr. Rajendra Jeur | ७८-८ |

 ISBN: 978-81-93171

# कोविड-१९ काळातील भारतातील बेरोजगारी: एक गंभीर समस्या

*डॉ.सोमनाथ विष्णु काळे,
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**डॉ.कैलास सुनील पाटील,
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

## प्रस्तावना

बेरोजगारीचे सातत्याने वाढणारे प्रमाण हे कोणत्याही देशासाठी चिंतेची बाब असते. भारतासारख्या देशाला तर या समस्येकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही बेरोजगारीचे वाढते प्रमाण ही सरकारची डोकेदुखी ठरते. भारतातील संशोधन संस्था, तज्ज्ञ, अभ्यासक हे सातत्याने देशातील बेरोजगारीच्या स्थितीवर भाष्य करत असतात. तसेच विविध संशोधन संस्था, अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणारे तज्ज्ञ रोजगार संधी वाढविण्यासाठी वेगवेगळे उपाय सुचवतात. त्यामध्ये सरकारची भूमिका अधिक ठळकपणे अधोरेखित केलेली असते. भारतामध्ये आढळणाऱ्या बेरोजगारीच्या स्वरूपावरून त्याचे विविध गटांमध्ये वर्गीकरण केले जाते. त्यामध्ये छुपी, संरचनात्मक, हंगामी तसेच चक्रीय स्वरुपाची बेरोजगारी इ. चा समावेश होतो. भारतामध्ये शेती क्षेत्रात प्रामुख्याने छुपी बेरोजगारी आढळून येते.

बेरोजगारीचा प्रश्न हा भारताच्याच नव्हे तर जगातील सर्वच देशांच्या अर्थकारण, समाजकारण आणि राजकारण यादृष्टीने खूपच महत्वाचा असून, प्राधान्याचा देखील बनलेला आहे. आज मुख्यत: विकसनशील देशांसमोर बेरोजगारीचे खूपच गंभीर स्वरूप दिसत आहे. तसेच खाजगीकरण व जागतिक बाजारातील भागीदारी यांचा समावेश असलेल्या आर्थिक औद्योगिक धोरणामुळे बेरोजगारीची समस्या आणखीनच गंभीर होत आहे. भारतामध्ये आढळणाऱ्या बेरोजगारीमध्ये छुपी व उघड बेरोजगारी हे ढोबळमानाने गणले जाणारे प्रकार आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली ७० वर्षे भारताने नियोजनाचा अवलब केला आहे. परंतु एवढ्या सातत्यपूर्ण दीर्घकालीन प्रयत्नानंतरही देशातील बेरोजगारी, दारिद्र्य व विषमता हे प्रश्न पूर्णपणे सुटले नाहीत.

'एखाद्या व्यक्तीची विशिष्ट काम करण्याची इच्छा व पात्रता असून प्रचलित वेतनदर मान्य असताना देखील काम मिळत नसेल तर त्यास बेरोजगारी असे म्हणतात. यालाच नैसर्गिक बेरोजगारी असे म्हणतात.'

बेकारीचे समूळ निर्मुलन करून पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे आर्थिक विकासाचा महत्वाचा निकष मानला जातो. बेकारीचे ऐच्छिक बेकारी व अनैच्छिक बेकारी असे दोन प्रमुख प्रकार केले जातात. त्यापैकी अनैच्छिक बेरोजगारी ही आर्थिक व सामाजिक दृष्टीने गंभीर समस्या असून ती आर्थिक विकासातील प्रमुख अडथळा ठरते. अनैच्छिक बेकारीचे उघड बेरोजगारी व छुपी बेरोजगारी असे दोन प्रकार केले जातात. याशिवाय चक्रीय (व्यापार चक्रांमुळे निर्माण होणारी) बेरोजगारी, घर्षणात्मक बेरोजगारी, तंत्रवैज्ञानिक बेरोजगारी, सुशिक्षितांची बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी इ. विविध बेरोजगारीचे प्रकार आहेत.

बेरोजगारी आणि आर्थिक पातळीवर देश चाचपडत असतानाच २०२० च्या सुरुवातीलाच कोरोना विषाणूचा भारतात प्रवेश झाला. जगातील बहुतांश देशांबरोबरच भारतातही कोरोना विषाणूचा अत्यंत वेगाने प्रसार झाल्याने जगाबरोबर भारतावरही त्याचे तीव्र परिणाम जाणवले. कोव्हिड-१९ ही जागतिक महामारी म्हणून घोषित होऊन आता १० महिने झाले. अजूनही संपूर्ण जगात लसीकरण होणे आणि ही स्थिती बदलण्यासाठी लस किती उपयुक्त आहे, हे ठरवणे बाकी आहे. विषाणूचा प्रसार होत असल्याने केंद्र व राज्य सरकारांनी मुक्त संचारावर लावलेल्या निर्बंधामुळे सर्वच क्षेत्रांदर त्याचा गंभीर परिणाम झाला. यातच भारतातील बहुसंख्य रोजगार असंघटित क्षेत्रात असल्याने, कामाच्या अभावाने आणि संचार बंदीमुळे झालेल्या गैरसोयीने लाखो स्थलांतरीत मजुरांना त्यांच्या मूळ गावी परत जावे लागले. देशातील पर्यटन, रिटेल आणि हॉस्पिटॅलिटी आणि इतर क्षेत्रावरही नकारात्मक परिणाम झाला. ऑगस्ट-२० नंतर टप्प्याटप्प्याने अवलंबलेल्या अनलॉक धोरणामुळे मुळे ही स्थिती बदलली असून या क्षेत्रांत चांगलीच सुधारणा होत आहे.

## उद्दिष्ट्ये

१. कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासावर झालेला परिणाम अभ्यासणे.
२. कोविड-१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती व तथ्य संकलन**

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा वापर केला असून संबधित दुय्यम माहिती विविध संदर्भ पुस्तके, आर.बी.आय बुलेटिन, रोजगार मंत्रालयाचे तसेच इतर शासकीय कार्यालयांचे वार्षिक अहवाल, विविध शासकीय कार्यालये व मंत्रालय यांची संकेत स्थळे यामधून संकलित केली आहे.

**टेबल: १ - देशाचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न व बेरोजगारी :**

**भारतातील बेरोजगारी व जी.डी.पी. वाढीचा दर**
**(२००९-१० ते २०१९-२०)**

| वर्ष | बेरोजगारीचे प्रमाण (%) | जी.डी.पी. वाढ (%) |
|---|---|---|
| २००९ -१० | ५.६४ | १०.२६ |
| २०१० -११ | ५.६४ | ६.६३ |
| २०११ -१२ | ५.६५ | ५.४५ |
| २०१२ -१३ | ५.६७ | ६.३८ |
| २०१३ -१४ | ५.६१ | ७.४१ |
| २०१४ -१५ | ५.५७ | ७.९९ |
| २०१५ –१६ | ५.५१ | ८.२५ |
| २०१६ -१७ | ५.४२ | ७.०४ |
| २०१७ -१८ | ५.३३ | ६.१२ |
| २०१८ -१९ | ५.३६ | ४.१८ |
| २०१९ -२० | ५.४० | -१०.२८ |
| 2020-21 | | |

**स्त्रोत :** tradingeconomics.com

**सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी**

२०२० च्या दशकात सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे बेरोजगारीचे प्रमाण ५.६४ % वरून ५.४०% पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. तसेच २०१२ पासून २०१६ पर्यंत जीडीपी वाढीचा दर ५.४५ % वरून २०१६ पर्यंत ८.२५ % पर्यंत वाढला होता. परंतु २०१६ मधील आततायीपणे अवलंबलेले नोट बंदीचे धोरण आणि २०१८ मधील घाईघाईने अवलंबलेले जीएसटी धोरण यामुळे अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांवर त्याचा काहीसा प्रतिकूल परिणाम झाला. त्यामुळे २०१९ पर्यंत हा दर ४.१८ % कमी झाला आहे.

**कोविड-१९ चा रोजगारावर झालेला परिणाम:**

**टेबल: २ – कोविड-१९ चा बेरोजगारीवर झालेला परिणाम**

| महीना | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७.६ | ७.२ | ७.८ | ८.८ | २३.५ | २१.७ | १०.२ | ७.४ | ८.४ | ६.७ | ७ | ६.५ |

**स्त्रोत :** tradingeconomics.com

**सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी**

मे-२०२० मध्ये देशातील बेरोजगारीचा दर अत्युच्च पातळीवर (२३.५%)असल्याचे दिसून येते. जून -२०२० नंतर टाळेबंदीचे नियम शिथिल केल्यामुळे बेरोजगारी कमी होत आहे. डिसेंबर २०२० मध्ये बेरोजगारीचा दर ६.५ % पर्यंत कमी झाला आहे.

**टेबल: ३ – कोविड-१९ चा जीडीपी वाढीवर झालेला परिणाम**

| आर्थिक वर्ष | जीडीपी वाढीचा दर (२०१०-११ च्या किमतीनुसार ) | | | | | जीडीपी वाढीचा दर (चालू किमतीनुसार ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Q1 | Q2 | Q3 | Q4 | एकूण | Q1 | Q2 | Q3 | Q4 | एकूण |
| २०१९-२० | ५.२४ | ४.४२ | ४.०८ | ३.०९ | ४.१८ | ८.०६ | ५.८७ | ७.३९ | ७.५३ | ७.२१ |
| २०२०-२१ | -२३.९२ | -७.५४ | - | - | -१५.६७ | -२२.५७ | -४.०४ | - | - | -१३.३० |

**स्त्रोत:** http://statisticstimes.com/

 ISBN: 978-81-93171

मागील आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी वाढीचा दर सातत्याने कमी होत होता. कोरोना महामारीमुळे २०-२१ या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत अत्यंत नीचांकी पातळीवर (-२३.९२ %) घसरला होता. नंतर त्यामध्ये सुधारणा होऊन दुसऱ्या तिमाहीमध्ये -७.५४ % झाला आहे.

टेबल: ४ – कोविड-१९ चा क्षेत्रीय विकासदरावर झालेला परिणाम

| क्षेत्र | विकास दर (२०१०-११ च्या किमतीनुसार ) | | विकास दर (चालू किमतीनुसार ) | |
|---|---|---|---|---|
| | Q1 | Q2 | Q1 | Q2 |
| कृषी | ३.३७ | ३.३९ | ५.६९ | ७.७ |
| औद्योगिक | -२८.०८ | -२.०८ | -३९.४७ | -२.७ |
| वस्तुनिर्माण | -३९.३० | ०.६२ | -३९.३२ | १.७५ |
| बांधकाम | -५०.२५ | -८.५९ | -५१.३८ | -८.३८ |
| सेवा | -२०.६४ | -११.४३ | -१८.४० | -७.५५ |

स्त्रोत: http://statisticstimes.com/

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या आकडेवारीनुसार कृषी क्षेत्र वगळता अर्थव्यवस्थेतील इतर सर्व क्षेत्रांचा विकास दर पहिल्या दोन तिमाहीमध्ये ऋणात्मक असल्याचे दिसून येते. टाळेबंदीचा बांधकाम, वस्तुनिर्माण आणि औद्योगिक क्षेत्रावर खूपच नकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून येते. बांधकाम क्षेत्राचा विकासदर

### समारोप

देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकार आटोकाट प्रयत्न करत असताना कोरोना चे अभूतपूर्व संकट जगावर ओढवले. भारतातही त्याचे तीव्र प्रतिकूल परिणाम दिसून आले. आधीच राज्यात आणि एकूणच देशभरात बेकारीने कळस गाठला होता. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी टाळेबंदी सारखे अगदी टोकाचे उपाय योजावे लागले. कोरोना महामारीमुळे सर्वच क्षेत्रातील उत्पादन प्रक्रिया पूर्णतः मंदावल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढले. सर्वच क्षेत्रातील उत्पादन वाढीच्या दरामध्ये लक्षणीयरीत्या घसरण झाली. आधीच जीडीपी तील घसरण आणि बेरोजगारीच्या कड्यावर असलेली उभी असलेली भारतीय अर्थव्यवस्था उत्पादन घट आणि बेरोजगारीच्या खाईत लोटली गेली.

आधीपासूनच आर्थिक कोंडीचा सामना करावा लागत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेवर कोविड १९ चा खूप गंभीर परिणाम झाला आहे. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी केलेल्या टाळेबंदीमुळे देशाच्या विकासदराने मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत मोठी घट नोंदवली आहे. देशातील कृषी क्षेत्राचा अपवाद वगळता इतर सर्व क्षेत्रांचा विकासदर उणे पातळीवर आहे. व्यापार आणि निर्यात क्षेत्रावर देखील खूपच गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी भारताला विशेषतः स्थानिक पातळीवरील तात्पुरत्या रोजगाराच्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करणे तसेच लघु व मध्यम उद्योग दिवाळखोरीपासून वाचवणे आवश्यक आहे.

### संदर्भ


1. Datt, Ruddar & Sundharam, K.P.M. Indian Economy.
2. Gaurav Datt and Ashwini Mahajan : ((May 2 2013), S. Chand & Company, New Delhi.
3. डॉ. निर्मल भालेराव आणि डॉ. स. मु. देसाई : (२०१९) निराली प्रकाशन, पुणे
4. Economic Survey: 2019-20
5. Union Budget: 2020-21
6. http://statisticstimes.com/
7. http://statisticstimes.com/
8. https://tradingeconomics.com